**समादेशक, भारत राखीव बटालीयन-2, राज्य राखीव पोलीस बल गट क्र 15, बिरसी कॅम्प गोंदिया**

**पोलीस भरती 2021**

**लेखी परिक्षेकरीता पात्र उमेदवारांची निवड यादी**

**दिनांक** 01/02/2023

-: **उमेदवारांना सुचना** :-

उमेदवारांना कळविण्यात येते की, भारत राखीव बटालियन-2, राज्य राखीव पोलीस बल गट क्र-15, बिरसी कॅम्प गोंदिया या आस्थापनेवर सन 2021 मध्ये रिक्त असलेल्या 40 पदांकरीता सशस्त्र पोलीस शिपाई भरती आयोजित करण्यात आलेली आहे. सदर पोलीस भरतीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या मैदानी चाचणीत उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार 1:10 या प्रमाणात लेखी परिक्षेकरीता प्रवर्ग निहाय निवड यादी उमेदवारांनी MAHAIT द्वारे संकेतस्थळावर ऑनलाईन अर्जामध्ये नमुद केलेले प्रवर्ग, व समांतर आरक्षण या माहितीच्या आधारावर तयार करण्यात आलेली आहे.

मैदानी चाचणीत उमेदवारांना मिळालेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसार लेखी परिक्षेकरीता प्रवर्ग निहाय तात्पुरती निवड यादी उमेदवारांच्या माहिती करीता www.mahapolice.gov.in अणि www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थाळावर व या आस्थापनेवरील मुख्य प्रवेशद्वाराच्या नोटीस बोर्डावर दिनांक 21/01/2023 रोजी जाहिर करण्यात आली होती.

तरी उमेदवारांनी याबाबत नोंद घेवुन या संबंधात काही हरकती किंवा आक्षेप असल्यास या कार्यालयाच्या ई-मेल आयडी srpfgr15@rediffmail.com यावर किंवा दुरध्वनीक्रमांक 07182-295213 वर लेखी स्वरुपात किंवा प्रत्यक्ष रित्या समादेशक कार्यालय येथील नियत्रंण कक्ष, भाराब-2, रारापोबल गट क्र 15, बिरसी कॅम्प गोंदिया येथे समक्ष हजर राहुन दिनांक 24/01/2023 चे 10.00 वाजे पर्यंत सविस्तर आक्षेप कारणासह नोंद करणेबाबत सुचना देण्यात आली होती.

त्या अनुषंगाने सदर निवड यादीवर प्राप्त झालेले आक्षेप चे निवारण करण्यात आलेले असुन सदर यादीमध्ये कोणत्याही प्रकारे बदल न झाल्याने दिनांक 21/01/2023 रोजी जाहिर करण्यात आलेली प्रवर्ग निहाय तात्पुरती निवड यादीस **कायम** ठेवण्यात येत आहे.

पोलीस भरती 2021 ची लेखी परिक्षेचे दिनांक निश्चित झाल्यावर उमेदवारांना या बाबतची माहिती www.mahapolice.gov.in अणि www.maharashtrasrpf.gov.in या संकेतस्थाळावर व या आस्थापनेवरील मुख्य प्रवेशद्वाराच्या नोटीस बोर्डावर प्रकाशित करण्यात येईल. याची कृपया उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**( विवेक मासाळ )**
समादेशक तथा भरती प्रमुख
भारत राखीव बटालीयन-2,
राज्य राखीव पोलीस बल गट क्र 15,
बिरसी कॅम्प गोंदिया